महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी
३४३५ १२९४ ही योजना बंद करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.८०/तांत्रिक कक्ष-४
१५ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक: २६ ऑक्टोबर, २०२६

वाचा :
१. पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.बजेट-२००९/प्र.क्र.८७/तां.क.-३, दि.२२ मार्च, २०१०
२. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.३०.०१.२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना:

राज्याच्या तटीय क्षेत्राचे पर्यावरणदृष्ट्या संरक्षण व संवर्धन करण्यासाठी केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने राज्यात पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटीची ( MCZMA ) स्थापना केलेली आहे.

२. तटीय क्षेत्रातील इकॉलॉजिकली संवेदनशील क्षेत्र ठरवून त्याचे व्यवस्थापन आराखडे तयार करणे, मॅन्ग्रोव्ह संरक्षण करणे, व एकूण तटीय क्षेत्राच्या पर्यावरणीय व्यवस्थापनाच्या समन्वयाचे काम या अथॉरिटी मार्फत केले जाते. मा. उच्च न्यायालयाने मॅन्ग्रोव्हजच्या मॅपिंग बाबत व सक्षम व्यवस्थापनाबाबत याचिका क्र.३२४६/२००४ अन्वये आदेश दिलेले असून, त्याची तात्काळ अंमलबजावणी शुरू करण्यात आली आहे. सदर बाब विचारात घेता व MCZMA कडील जबाबदाऱ्या लक्षात घेता MCZMA ला आर्थिक सहाय्य देण्याच्या अनुषंगाने दि.२३ जून, २००९ रोजी सिंधूदुर्ग येथे पार पडलेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत कोकण विशेष पॅकेज अंतर्गत MCZMA स आर्थिक सहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने दि.२२/३/२०१० च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटीस सहायक अनुदाने या कार्याक्रमाखाली महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीस निधी देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.३०/१/२०२६ रोजी सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांच्या सोबत घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये, ज्या राज्य योजनांचा मागील तीन आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष खर्च रू.२५ कोटी पेक्षा कमी आहे, अशा सर्व योजनांचा आढावा घेण्याचे निदेश देण्यात आले होते. मागील तीन आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष खर्च रू.२५ कोटी पेक्षा कमी आहे अशा योजनांचा आढावा घेताना, मा.मुख्य सचिव यांनी सदर बैठकीमध्ये, विभागांना दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत दि.४/२/२०२६ च्या पत्रान्वये वित्त

विभागाने कळविले आहे. त्यानुषंगाने, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी ३४३५ १२९४ या लेखाशिर्षांतर्गत प्रत्यक्ष खर्च २५ कोटीपेक्षा कमी असल्याने सदर योजना बंद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी ३४३५ १२९४ या लेखाशिर्षांतर्गत प्रत्यक्ष खर्च २५ कोटीपेक्षा कमी असल्याने सदर योजना याद्वारे बंद करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी अंतर्गत परिवेश पोर्टलवर सिआरझेड अनुमती प्रस्ताव प्राप्त होत असतात. सदर प्रस्तावासाठी छाननी शुल्क प्रस्तावनिहाय आकारले जाते. त्यामुळे, सदर शुल्काची रक्कम ही महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटीच्या नावे असलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा होत राहते. त्यामुळे, सदर खात्यातील जमा रक्कमेतून भविष्यातील सिआरझेड नकाशाच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या बाबींवरील खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी ३४३५ १२९४ या लेखाशिर्षांमधून भविष्यात कोणताही खर्च प्रस्तावित नाही. तसेच सद्यस्थितीत कार्यासनाकडे याबाबत कोणतेही दायित्व प्रलंबित नाही.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६१०२६१२१३०७१८०४ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHAHEEN SWALI SHAIKH

Digitally signed by SHAHEEN SWALI SHAIKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=ENVIRONMENT AND CLIMATE CHANGE,
2.5.4.20=9511E997A3875EDBD0967FA4CEEC8AC31B688631DE1C7A35E19DC30961F0438D, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=856C57BEF6C4D3EF93F04760CAD099503CA65FCA1896CF77AC80CEFD468D30EA, cn=SHAHEEN SWALI SHAIKH
Date: 2026.10.26 12:14:00 +05'30'

**( शाहीन शेख )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:-**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री तथा मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उप मुख्यमंत्री तथा मा.मंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सर्व जिल्हाधिकारी
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र , मुंबई/नागपूर
९. निवडनस्ती/ तांत्रिक कक्ष-४